वाचले :-

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२४/प्र.क्र.८९/नवि-२२, दिनांक १५ ऑक्टोबर २०२४
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१
३. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५५९/२०२० दिनांक २० ऑगस्ट, २०२०
४. पदोन्नती समिती सभा दि.०४/०२/२०२५ चा सभावृत्तांत
५. मा.प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्र.८४७, दि.११/०२/२०२५
६. सामान्य प्रशासन विभागाकडील दि. ११/०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/१०४/२०२५
दिनांक ११/०२/२०२५

**विषय :- 'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पीसीसी-२०२४/प्र.क्र.८९/नवि-२२, दि. १५ ऑक्टोबर २०२४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** अभिनामाचे पद **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी र.रु ७८८००-२०९२००** मध्ये शासन मंजूर आहे. **'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** अभिनामाचे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/०२/२०२५ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग - १ ची पदे पदोन्नतीने भरताना त्यांस शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. परंतु महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विभागाची आवश्यकता विचारात घेता **'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** अभिनामाचे पद सद्यस्थितीत रिक्त ठेवणे योग्य नाही. यास्तव दि.०४/०२/२०२५ रोजीच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून खालील अधिका-यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार**'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** पदावर **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी र.रु ७८८००-२०९२००** या वेतनश्रेणीत मा. महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | अधिकारी नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | गायकवाड बापू केरबा | ज्येष्ठतेनुसार | शहरी दळणवळण विभाग |

मा.प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्र. ८४७, दि.११ /०२/२०२५ अन्वये उपरोक्त अधिकारी यांना **'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६ सदरहू अट शिथील करण्यात येवून 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अंतर्गत नमूद सांविधानिक पदांव्यतिरिक्त उर्वरीत गट –अ मधील पदे पदोन्नतीने भरताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३

मधील तरतुदीनुसार महानगरपालिका सभेच्या मान्यतेने भरण्यात यावीत' याप्रमाणे शासन मंजूर पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मध्ये दुरुस्ती करण्यात यावी याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त अधिका-यांना **'सह शहर अभियंता (शहरी दळणवळण विभाग)'** अभिनामाचे पदावर **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी
प्रत-
१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

उप आयुक्त (सा.प्र.वि.)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,